# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१७१ दिनांक - ०३/०५/२०२४

## परदेशात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून तरुण मुलांची लाखो रुपयांची फसवणूक करणा-या आरोपीतांना अटक - नवघर पोलीस ठाणेची कामगिरी

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २५८/२०२४ भादविस कलम ४१९, ४२०, ४०६, ३४ सह दि इमिग्रेशन ॲक्ट १९८३ चे कलम १०, २४ प्रमाणे दि.२७/०४/२०२४ रोजी गुन्हा नोंद होता. गुन्हयातील फिर्यादी श्री पवन नसीब सिंग वय ३८ वर्षे धंदा- जे.सी.बी ऑपरेटर. रा. रुम नं. १५९/ ए, व्हिलेज गाव बनवाल, जि.पठाणकोट, सुजानपुर, राज्य-पंजाब यांना आरोपींनी इगल प्लेसमेंट सर्व्हीसचे, नसीब अपार्टमेंट, रुम नं १०३, जेसल पार्क, भाईंदर पुर्व येथील कंपनीद्वारे परदेशात नोकरीस लावण्याचे अमिष दाखवुन त्यांचा पासपोर्ट स्वत:कडे ठेवुन घेवुन आरोपींकडे कोणताही नोकरीस लावण्याचा परवाना नसतांना परदेशात नोकरीस पाठवतो असे सांगुन फिर्यादीकडून एकुण रु ७९,०००/- इतकी रक्कम घेवून फिर्यादीची फसवणूक केली त्यारुन गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान अशाच प्रकारे एकूण १०० ते १५० तरुणांची आरोपींनी फसवणुक करुन रुपये १०,२०,०००/- एवढया रक्कमेचा तपासात अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून मा.पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-०१, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो. नवघर विभाग तसेच मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. नवघर पोलीस ठाणे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता सुचना केल्या त्याप्रमाणे नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन तांत्रिक विश्लेषण करुन नमूद गुन्हयातील आरोपी नामे १) अबरार अहमद मुक्तार शहा उर्फ अशपाक वय-४६ वर्षे २) वसिम ऊर्फ साहील यासिन शहा ३) मोहम्मद तारीक ऊर्फ फैजल कादरी अब्दुल गफार सिदिदकी सर्व रा.मिरारोड पुर्व मूळ रा.उत्तरप्रदेश यांना निष्पन्न करुन आरोपींचा गुन्हयात सहभाग दिसून आल्याने आरोपींनां उपरोक्त गुन्हयात अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून गुन्हयातील फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ६,०२,०००/- रुपये रक्कम तसेच १४९ पासपोर्ट जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि संदिप पालवे, सपोनि/अमोल तळेकर, सपोनि/विशाल धायगुडे, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, पोह-०७०९७/भुषण पाटील, पोह/०६११७/संतोष पाटील, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत, पोशि-अस्वर, पोशि-पवार, पोशि-कारंडे,पोशि-मगर तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.